**<u>नियमीत दरखास्त क्र.४/२०१७</u>**
**<u>शकुंतलाबाई जैन वि. गणेश वरे व ईतर</u>**
**<u>निशाणी २९ खालील आदेश</u>**

जे.डी. ने प्रस्तुत अर्ज दाखल करुन असे कथन केले आहे की, सदर दरखास्तमध्ये डी.एच. यांनी त्याच्या चतु:सिमा व्यवस्थित दर्शविलेल्या नाहीत. तसेच त्यांनी निशाणी क्र.९ मध्ये वर्णन केलेली वाद मिळकत ही कोणाच्या मालकीची आहे व त्याच्या चतु:सिमा कोणत्या आहेत हे देखील दर्शविलेले नाही. मुळात वादीची दरखास्तच चुकीची आहे. डी.एच.ची निशाणी क्र.९ ची मागणी देखील चुकीची आहे. डी.एच. यांच्या मागणीप्रमाणे त्याच्या मालकीची कोणतीही जागा त्यांनी वर्णन केलेल्या दरखास्तीमध्ये नाही. डी.एच. यांनी नियमानुसार संपूर्ण क्षेत्राची शासकीय मोजणी आणावयास पाहिजे व त्याचा भरणा देखील त्यांनी करायला पाहिजे परंतू डी.एच. यांनी असे केलेले नाही. त्यामुळेच मिळकतीचा व अतिक्रमणीत मिळकतीचा निश्चीत बोध होत नाही. अशा परिस्थीतीत डी.एच. यांची दरखास्त तर्कसंगत नसल्यामुळे खारीज करण्यात यावी.

२. याउलट डी.एच. यांनी त्यांचे म्हणणे दाखल केले असून असे कथन केले आहे की डी.एच.च्या मालकी हक्का बाबतचा मुद्दा हा दिवाणी दावा क्र.८५/२००९ मध्ये निकाल ता.१८.०७.२०१६ मध्ये निकाल व हुकूमनाम्यामध्ये डी.एच.ला मालक धरले आहे व वादी/डी.एच. चा दावा कोर्टाने मंजूर केला आहे. तसेच जेडीने दावा प्लॉटवर अतिक्रमण केलेले सिद्ध झाले आहे. तसेच डी.एच. निशाणी क्र.१ दरखास्तमध्ये वाद मिळकतीतील चतु:सिमेबाबतचे वर्णन केलेले आहे. तसेच निशाणी क्र.८ वर उपविभागीय अधिकारी सार्वजनिक बांधकाम, वाशिम यांनी नकाशा काढुन जेडीचे अतिक्रमण दावा प्लॉटवर दाखविलेले आहे. त्यामुळे जे.डी.चा अर्ज चालू शकत नाही. करीता जेडीचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात आला.

३. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रस्तुत अर्जातील जे.डी. यांनी वाद मिळकत कोणाच्या मालकीची हे डी.एच. ने दर्शविले नाही व चतु:सिमा देखील नमुद केल्या नाहीत. त्यामुळे दरखास्त प्रतिपालनीय नाही असे कथन केले आहे. परंतु निश्चीतपणे वादीने दाखल केलेला नि. दिवाणी दावा क्र.८५/२००९ हा मंजूर झाला असून सदर दाव्याच्या हुकूमनाम्याच्या अंमलबजावणीकरीता वादीने ही दरखास्त दाखल केली आहे. सदर दाव्याच्या निकालात वादी हा दावा मिळकतीचा मालक असल्याची बाब सिद्ध झालेली असून दावा मिळकतीचा ताबा वादीस देण्याचे निर्देश जेडी यांना देण्यात आले आहे. त्यामुळेच त्याबाबत कोणताही आक्षेप घेण्योच मुळात अधिकार जे.डी यांना नाही. त्यामुळेच हा अर्ज प्रतिपालनीय नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात येतो.

SHIRISH SUDHAKAR SAHASRABUDHE

Digitally signed by SHIRISH SUDHAKAR SAHASRABUDHE
Date: 2026.01.03 15:17:58 +0530

दिनांक —०२.०१.२०२६

(एस. एस. सहस्त्रबुद्धे)
दिवाणी न्यायाधीश (व.स्तर), वाशिम.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this PDF file judgment/order are same word to word, as per original judgment/order.

| | | |
|---|---|---|
| 1) | Name of Stenographer | :- S. V. Dere (Stenographer G-III) |
| 2) | Name of Court | :- Civil Judge (S.D.), Washim. |
| 3) | Date | :- 02/01/2026 |
| 4) | Order signed by the presiding officer on | :- 02/01/2026 |
| 5) | Order uploaded on | :- 03/01/2026 |